## 'पुनर्विचारा'ची संकल्पना व कलम ३७०

निवाडा करताना व निर्णय घेताना विचाराच्या प्राथमिक पातळीवर अनेकदा पक्षपात व पूर्वग्रह डोकं वर काढतात. फारसा विवेकी विचार नसलेल्या अवस्थेत अंतर्मनातून पूर्वग्रह उद्भवतात. काश्मीरच्या संदर्भात अनुच्छेद ३७० रद्द करण्याच्या प्रश्नावर (संयुक्त) जनता दलासारख्या लहान पक्षांनी पुनर्विचार करून केंद्र सरकारच्या निर्णयाला पाठिंबा देण्याचं ठरवलं. काँग्रेस पक्षाच्या काही सदस्यांनीही व्यक्तिगत पातळीवर पुनर्विचारानंतर या निर्णयाला पाठिंबा देण्याचं ठरवलं, हीसुद्धा रोचक बाब आहे. केंद्र सरकारचे आपण राजकीय विरोधक आहोत, असा दावा करणाऱ्या आम आदमी पक्ष व बहुजन समाज पक्ष यांसारख्या लहान पक्षांनीही, काश्मीरचा विशेष दर्जा काढून घेणाऱ्या सरकारी निर्णयाला पुनर्विचारानंतर पाठिंबा दिला.

तर, सरकारच्या निर्णयाचे हे नवीन समर्थक आधी काश्मीरच्या विशेष दर्जाला पाठिंबा देत होते, पण प्राथमिक विचाराच्या पातळीवर स्वतःच्या आकलनात राहिलेल्या त्रुटी पुनर्विचारानंतर दूर करण्याची क्षमता त्यांनी दाखवून दिली. हे नवीन समर्थक स्वतःच्या विचारावबाबत शंका उपस्थित करण्याची व नंतर स्वतःच्या विचारात दुरुस्ती करण्याची प्रवृत्ती राखून असावेत, त्यामुळेच त्यांना पुनर्विचाराची गरज भासली. अनुच्छेद ३७०संबंधी पुनर्विचारानंतर घेतलेली आपली भूमिका बिनचूक असेल, असंही त्यांना वाटत असावं. या सर्व नवीन समर्थकांमध्ये पुढील गोष्टी समान आहेत : काश्मीरच्या विशेष दर्जाला पाठिंबा देण्याचा निर्णय चुकीचा आहे, असं त्यांना (संयुक्त) जनता दल व काँग्रेस पक्षाचे काही सदस्य विचारांच्या पहिल्या फेरीत वाटलं, मग पुनर्विचारावेळी त्यात दुरुस्ती करण्याची गरज भासली. दुसऱ्या फेरीतल्या विचारांमध्ये राजकीय हुशारीचं बिनचूक ज्ञान सामावलेलं असतं, त्यानुसार चिंतन-मनन करून हा निर्णय घेतला जातो. इथे एक प्रश्न उपस्थित करता येईल : अनुच्छेद ३७०मधील महत्त्वाच्या तरतुदी रद्द करण्याच्या निर्णयाविषयी बिनचूक ज्ञान उपलब्ध आहे का? स्वतःच्या विचारातील दुरुस्ती म्हणून असा निर्णय घेतला जात असेल तर त्याचं नैतिक बळ कितपत असतं?

या नवीन समर्थकांच्या निर्णयाचंही मूल्यमापन करण्याची गरज आहे. या निर्णयामुळे पर्यटक, अमरनाथ यात्रेकरू यांनाच नव्हे, तर काश्मीर खोऱ्यात राहाणाऱ्या लोकांनाही दीर्घकालीन वाईट परिणाम भोगावे लागण्याची शक्यता आहे, या वस्तुस्थितीची जाणीव विरोधी पक्षांनी सरकारला करून द्यायला हवी होती. केंद्र सरकारच्या निर्णयाचं समर्थन करण्यामागे या पक्षांची स्वतःची काही कारणे असू शकतील. पण या निर्णयाच्या परिणामांची कारणमीमांसा सरकारला पटवून देणं, हे या पक्षांच्या दृष्टीने अधिक व्यापक मानवतावादी व वैश्विक ठरलं असतं. अशा वैश्विक दृष्टिकोनाआधारे या पक्षांनी व व्यक्तिगत सदस्यांनी त्यांच्या राजकीय व्यवहारात नैतिक सातत्य राखावं, अशी अपेक्षा असते. अनुच्छेद ३७० रद्द करण्यासारखा संवेदनशील निर्णय घेताना सरकारने भौतिक सुरक्षेला सर्वोच्च महत्त्व द्यायला हवं.

ज्या पक्षांनी समाजातील त्रस्त घटकांच्या बाजूने उभं राहून स्वतःचे प्रगतिशील विचार ठामपणे मांडावेत, अशी अपेक्षा असते, ते पक्ष हे उद्दिष्ट गाठण्यात अपयशी

ठरत आहेत, अशी सध्याच्या व्यवहारकेंद्री राजकारणाची पातळी आलेली आहे. स्पष्टपणे सांगायचं तर, हे पक्ष स्वतःच्या राजकीय सुज्ञतेवर सातत्याने लक्ष ठेवण्यात कमी पडतात, त्यामुळे स्वतःच्या वैध लोकशाही आकांक्षांना घटनात्मक संरक्षण टिकून राहील, याची तजवीज करण्यातही त्यांना अपयश येतं. दुर्दैवाने, समकालीन राजकारणामध्ये असे लहान पक्ष खूप जास्त संदिग्धता दाखवतात, परिणामी भारताच्या कानाकोपऱ्यातील त्रस्त घटकांच्या बाजूने ठाम निर्णय घेण्याची त्यांची क्षमता खालावते.

लोकशाहीविषयक वंचना सहन करणाऱ्या सामाजिक गटांचं प्रतिनिधित्व आपण करतो, असा दावा करणारे हे पक्ष आहेत. परंतु, कोणत्याही चर्चाविमर्शाविना केवळ स्वतःच्या 'शहाणीवे'च्या बळावर निर्णय घेणाऱ्या सत्ताधारी चौकटीपुरत्या सीमान्त घटकांच्या आकांक्षा मर्यादित राहायला नको, हे या पक्षांच्या लक्षात येत नाही. हे पक्षही प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे सरकारचा भाग असतात, पण सक्षम सरकार सीमान्त घटकांच्या मतांच्या आधारावरच स्वतःचं अधिकारी मत मांडण्याचं सामर्थ्य मिळवत असतं, हेसुद्धा या पक्षांना कळत नाही. सक्षम राज्यसंस्था आणि कणाहीन पक्ष व राजकारणी यांच्यातील तार्किक दुव्याची जाणीव होण्यासाठी चांगल्या पुनर्विचाराची गरज आहे.

राजकीय सुज्ञपणावर विवेकी लक्ष ठेवणं, हा चांगल्या पुनर्विचारप्रक्रियेचा भाग असतो. राज्यघटनेतील लोकशाही तत्त्वांनुसार देशाचं शासन चालवण्यासंदर्भात सरकारला उत्तरदायी ठरवायला हवं, ही जाणीव पक्षांना व लोकप्रतिनिधींना होण्यासाठी पुनर्विचाराची अशी पक्रिया उपयुक्त ठरते. परंतु, चांगल्या पुनर्विचार प्रक्रियेला प्राथमिक फेरीतल्या विचारांकडून सातत्याने आव्हान मिळत असते. विचारसरणीच्याबाबतीत हा पहिल्या फेरीतील विचार 'बिनचूक' असतो, परंतु अपुऱ्या माहितीवर आधारित राजकीय निवाड्यामध्ये सातत्याने सुधारणा करण्यासाठी चांगला पुनर्विचार गरजेचा असतो, त्याचा अवकाश मात्र पहिल्या फेरीत मिळत नाही. सामाजिक-राजकीय परिस्थितीमध्ये स्थिर सुधारणा होण्यासाठी आणि लोकशाही राज्यघटनेद्वारे शासन चालेल याची हमी मिळण्यासाठी, ही चांगली पुनर्विचार प्रक्रिया महत्त्वाची ठरते.

●

## संघराज्यप्रणालीची मूल्ययुक्तता

*काश्मीरसंबंधीचा अनुच्छेद ३७० रद्द करण्यामागील गृहितकं ठिसूळ पायावर आधारलेली आहेत.*

जम्मू-काश्मीरचा विशेष दर्जा रद्द करून त्यातून दोन केंद्रशासित प्रदेश निर्माण करण्याचा निर्णय केंद्र सरकारने तडकाफडकी जाहीर केला. त्याची एका बाजूने प्रशंसा झाली, तर अनेक प्रकारचे आक्षेपही त्यावर घेण्यात आले. नागरी समाजाचे सदस्य, सार्वजनिक बुद्धिजीवी, व विरोधी पक्षांमधील राजकीय नेते यांनी उपस्थित केलेल्या आक्षेपांची पुरेशी नोंद झालेली आहे, त्यामुळे त्याची इथे पुनरुक्ती नको. काश्मीर प्रश्नाकडे विरोधकांच्या दृष्टिकोनातून पाहिलं तर, घटनात्मक नियम व चर्चात्मक लोकशाहीचे नियम यांचा भंग झाल्याचा निर्देश करण्याला प्राधान्य द्यावं लागेल, आणि या प्रक्रियेतील अन्यायाला आदर्शलक्ष्यी भाषेतून वाचा फोडावी लागेल. जम्मू-काश्मीरचा विशेष दर्जा काढून घेण्याच्या निर्णयाचं समर्थन करताना वापरली जाणारी अधिकृत भाषा होकारात्मक आहे, त्याला विरोधकांनी छेद देण्याची गरज आहे.

या कृतीसंदर्भात केंद्र सरकारने पुढे केलेलं समर्थन असाधारण नाही. काश्मीरचं एकीकरण साधणं त्या प्रदेशाच्या विकासासाठी व तिथल्या लोकांच्या कल्याणासाठी हिताचंच आहे. निराळ्या शब्दांत सांगायचं

तर, आपलं उद्दिष्ट साधण्यासाठी अनुच्छेद ३७० व त्याच्याशी जोडून असलेला अनुच्छेद ३५-ए या तरतुदी मुख्य अडथळा ठरत असल्याची सरकारची भूमिका होती. काश्मीरचं भारताशी ऐक्य साधण्यासाठी टोकाचं पाऊल उचलणं आवश्यक होतं, असं केंद्र सरकारचं व त्यांच्या समर्थकांचं मत आहे. त्यात आता इतर राजकीय घटकांचीही भर पडते आहे. केंद्रात व राज्यांमध्ये सक्षम सरकार हवं असेल, तर त्यासाठी असं ऐक्य अत्यावश्यक असतं, असं मत सदर निर्णयाचे समर्थक व्यक्त करत आहेत.

ऐक्य व सक्षम राष्ट्र यासंबंधीच्या अधिकृत कथनाचा सूर होकारात्मक स्वरूपाचा आहे. अशा कथनामध्ये एकीकरण, राष्ट्राचा व प्रदेशाचा विकास, आणि काश्मीर खोऱ्यातील लोकांचं कल्याण इत्यादी मुद्द्यांचा समावेश केला जातो. केंद्र सरकार या भूमिकेचा बराच गाजावाजा करतं, अस्थिर लोकशाही धारणा असणाऱ्या राजकीय वर्गातील अनेकांची भूमिका हीच असते, परंतु ती वास्तवापेक्षा वक्तृत्वावर भर देणारी आहे. विकासात्मक राष्ट्रवादाच्या पूर्वानुभवाच्या वास्तवाशी ही भूमिका पूर्णतः सुसंगत नाही. भारतीय संघराज्यप्रणालीचा भाग असलेल्या राज्यांमध्ये व आंतरराज्यीय पातळीवर उद्भवणारा प्रादेशिक तणाव याचाच दाखला आहे. संघराज्यप्रणालीचा भाग असलेल्या राज्यांची मूल्ययुक्तता सामायिक सौहार्दावर व शांततेवर जास्त अवलंबून असते, या राज्यांमध्ये राहाणाऱ्या लोकांना होणारा क्लेश व त्यांच्यातील परकेपणाची भावना यांवर अवलंबून नसते.

सत्तेचे केंद्रीकरण कल्याणकारी नसतं. अन्यथा, भारतामध्ये ग्रामीण भागांतून शहरांकडे तणावग्रस्त अवस्थेत स्थलांतर झालं नसतं. लोकांना गुणवत्तापूर्ण जगण्याची हमी देण्याची क्षमता शहरी भारताकडे नाही. समतोलपूर्ण व सुज्ञ प्रादेशिक विकासाकडे दुर्लक्ष झाल्यामुळे स्थलांतर वाढतं. यातून मानवी सभ्यतेचाही मोठा तोटा होतो, याचं एक उदाहरण म्हणून उत्तराखंडमधील हजारो गावांमधून बाहेर होणारं स्थलांतर विचारात घेता येईल. या गावांमध्ये आता मानवी वस्तीच उरलेली नाही, त्यामुळे 'नकली गाव' असं संबोधन त्यांना प्राप्त झालं आहे. तर, मानवी आणि पर्यावरणीय भरभराटीला एखादा भौतिक प्रदेश किती हातभार लावतो, यावर त्या प्रदेशाची मूल्ययुक्तता अवलंबून असते.

कायदेशीर तरतूद रद्द करून संधी उपलब्ध होतील, असा दावा केंद्र सरकार करतं आहे. पण आर्थिक व्यवहारासाठी तत्त्वतः मोफत उपलब्ध असलेल्या नागरी अवकाशांच्या समतापूर्ण वाटपावर राज्यसंस्थेचं कोणतंही नियंत्रण नसतं, ही वस्तुस्थिती मात्र सरकारने लक्षात घेतलेली दिसत नाही. अशा व्यवहारांचं अंगभूत तर्कशास्त्र असतं. विकासाची फळं सर्वसामान्यांनाही मिळतील, असं समर्थन सरकारी पातळीवरून केलं जात असलं, तरी वास्तवामध्ये या अंगभूत तर्कशास्त्रामुळे तसं घडत नाही. नागरी विकासाचा अनुभव बघता, केवळ अतिश्रीमंत नागरी वर्गालाच विकासाची फळं चाखायला मिळतात, या वर्गाने आपल्याभोवती कुंपण घालून घेतलेलं आहे- एका अर्थी त्यांनी आधुनिक अग्रहार निर्माण केले आहेत. पूर्वी द्विज लोक स्वतःची पवित्र वसाहत राखत असत, त्याला अग्रहार असं संबोधलं जायचं, आणि कनिष्ठ जातींमधील लोकांमध्ये क्षमता असेल तरी या वसाहतींमध्ये प्रवेश करण्याची परवानगी त्यांना नव्हती. अशाच प्रकारे काश्मीरविषयीचं अधिकृत कथन अन्यायाविरोधातील आवाजांना गिळंकृत करतं- विशेषतः काश्मीर खोऱ्यातील आवाजांना या कथनामध्ये अवकाश मिळत नाही. त्यांना किमान नैतिक प्रतिसादाची गरज होती. अनुच्छेद ३७०च्या संदर्भात आपल्या भवितव्याविषयी कोणता निर्णय घेतला जातो आहे, याची किमान माहिती केंद्र सरकारने द्यावी, अशी त्यांची अपेक्षा होती.

अशा प्रकारे निर्णय लादून सत्तेचं एकत्रीकरण करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे, परंतु त्यासाठी शांततापूर्ण चर्चेचा मार्ग सरकारने टाळला, यावरून

सत्ता केंद्रीकरणाचं उद्दिष्ट साधण्याकरिता सरकार उतावीळ आहे हे दिसून येतं. अशा कृतीचे परिणाम ताडता येणं सहज शक्य आहे. नियंत्रणाची उत्कट इच्छा भ्रामक ठरू शकते, आणि काही वेळा त्यातून विपरित परिणामही होण्याची शक्यता असते. केवळ काश्मीरच्या संदर्भातील संघर्षाच्या बाबतीत सत्तेचं केंद्रीकरण करण्याची इच्छा सरकार अंमलात आणतं आहे, परंतु शेती, रोजगार, व नागरी शासन यांसारख्या संघर्षाच्या अवकाशांकडे मात्र दुर्लक्ष होतंय (केवळ खूप तीव्र असलेल्या काही संघर्षांचा उल्लेख इथे केला आहे), त्यामुळेच हा प्रयत्न भ्रामक ठरतो. राज्यांना केंद्रशासित प्रदेशांमध्ये रूपांतरित करून सत्तावाटप कमी करण्याऐवजी सत्तावाटपाद्वारे संघर्षाबाबत वाटाघाटी करण्याची मोठी संधी संघराज्यप्रणालीमध्ये असते. परंतु, विद्यमान केंद्र सरकारने सत्तेच्या केंद्रीकरणाद्वारे संघर्षाबाबत वाटाघाटींचा प्रयत्न केला. विकेंद्रीत संघर्षांकडे दुर्लक्ष केलं, तर त्यातील पीडित घटकांचा भडका उडण्याची शक्यता असते. अन्योन्य स्वरूपाच्या संघराज्यप्रणाली असेल तर या संघर्षांकडेही समान लक्ष पुरवणं केंद्र सरकारला भाग पाडता येतं. त्याचप्रमाणे मानवी भरभराटीचा प्रभाव असलेल्या संघराज्यप्रणालीमध्ये समतावादी मूल्याचा समावेश असतो. सभ्यतेने राहाण्याजोगे भौतिक अवकाश निर्माण करण्यासाठी या मूल्याला पाठबळ द्यायला हवं.

●

## 'आरटीआय'मधील दुरुस्ती विरुद्ध सहभागाधारित लोकशाही

*नागरिक व राज्यसंस्था यांच्यात माहितीचा असमतोल असेल, तर पारदर्शक लोकशाहीचं कामकाज क्षीण होतं.*

संसदेत अलीकडेच 'माहिती अधिकार (दुरुस्ती) विधेयक' मंजूर करण्यात आलं. ही दुरुस्ती माहिती अधिकाराच्या गाभ्याला बाधा पोचवणारी आहे आणि केंद्रीय माहिती आयोग ही संस्था कमकुवत होण्याचा धोकाही या दुरुस्तीमुळे निर्माण झाला आहे. कायदानिर्मितीपूर्वी सल्लामसलत करण्याचं धोरण न पाळताच घाईगडबडीने हे विधेयक संसदेत मांडण्यात आलं, यावरून सरकारच्या हेतूंविषयी गंभीर शंका उपस्थित होतात. अशा दुरुस्त्यांची कठोर छाननी टाळणं या सरकारला का गरजेचं वाटतं? तज्ज्ञ समितीकडे विधेयक न पाठवण्यावर इतका भर का दिला जातो? या दुरुस्त्यांचं सूक्ष्म वाचन केलं, तर सरकारचा यामागील हेतू लक्षात येतो. संस्था व अधिकार औपचारिकरित्या अस्तित्त्वात ठेवण्यात आले, तरी त्यांचा गाभा पोकळ करून टाकण्याचा प्रयत्न हे सरकार करतं आहे.

शासनामधील गोपनीयता व सत्तेचा गैरवापर यांवर प्रश्नचिन्ह उमटवण्यासाठी नागरिकाचं सबलीकरण व्हावं, या उद्देशाने 'माहिती अधिकाराचा अधिनियम, २००५' (राइट टू इन्फर्मेशन/ आरटीआय ॲक्ट) अस्तित्त्वात आला. केंद्रीय व राज्यस्तरीय माहिती आयोगांच्या माध्यमातून माहिती उपलब्ध करून देण्यात आली. ही माहिती सार्वजनिक हिताची मानता येते, कारण ती नागरिकांच्या हितसंबंधांसाठी प्रस्तुत ठरणारी असते आणि पारदर्शक व चैतन्यशील लोकशाहीच्या कामकाजाचा हा एक महत्त्वाचा आधार असतो. 'माहिती अधिकार (दुरुस्ती) विधेयक, २०१९'ने 'माहिती अधिकार अधिनियम, २००५'मधील १३, १५ व २७ या कलमांमध्ये दुरुस्ती केली. केंद्रीय व राज्यस्तरीय माहिती आयुक्तांचा कार्यकाळ, पगार, भत्ते व सेवेच्या अटी यांबाबत नियम करून अधिकार गाजवण्याची मुभा केंद्र सरकारला या दुरुस्त्यांमुळे मिळणार आहे. परंतु, माहिती आयुक्तांचा कार्यकाळ, भत्ते व सेवेच्या अटी ठरवण्याचे अधिकार केंद्र सरकारला देणाऱ्या या दुरुस्त्या कार्यप्रेरक रचनेशी छेडछाड करणाऱ्या आहेत, त्यातून माहिती आयोगांची स्वायत्तता व स्वातंत्र्य क्षीण होईल आणि कायदा म्हणून माहिती

अधिकाराची परिणामकारक अंमलबजावणी करण्याला अडथळे येतील.

शिवाय, प्रत्येक राज्याच्या अखत्यारितील अधिकारांवर अतिक्रमण करून 'बळजबरीची संघराज्यप्रणाली' आचरणात आणणारी धोरणं हे केंद्र सरकार राबवतं आहे, त्याचाच आणखी एक आविष्कार या दुरुस्तीमधून दिसतो. हे लोकशाहीला धरून नाही. भविष्यात माहिती आयुक्तांच्या संस्थेच्या विश्वसनीयतेवर याचे गंभीर परिणाम होतील. नागरिक व राज्यसंस्था यांच्यातील माहितीचा असमतोल दूर करण्यासाठी ही संस्था कळीची आहे आणि लोकशाहीमधील शासनयंत्रणा कामकाजाच्या बाबतीत उत्तरदायी व पारदर्शक राहण्यासाठीसुद्धा ही संस्था महत्त्वाची असते. कर्त्या घटकाला किंवा सरकारला नागरिकांसाठी हितकारक उद्दिष्टं गाठण्यात कितपत यश येईल, हे शासनातील पारदर्शकतेच्या प्रमाणावर ठरतं. त्याचसोबत या माहितीमुळे इतरही अनेक उद्देश साध्य होतात, ज्यातून अखेरीस समाजाचे एकंदर हितही साधता येतं.

दर वर्षी, माहिती अधिकार अधिनियमाच्या आधारे सुमारे साठ लाख अर्ज दाखल होतात. जगातील सर्वांत वापरला जाणारा पारदर्शकता कायदा म्हणून माहिती अधिकार अधिनियमाची ओळख आहे. प्राथमिक अधिकारांच्या व हक्कांच्या पुरवठ्याबाबत सरकारला जबाबदार धरण्यापासून ते देशातील सर्वोच्च पदांना प्रश्न विचारण्यापर्यंत विविध मुद्द्यांशी संबंधित अर्ज यामध्ये केले जातात. माहिती अधिकार कायद्याचा वापर करून लोकांनी सरकारांकडून मागितलेली माहिती राज्यसंस्थेचे अनेक गैरप्रकार उघडकीस आणू शकणारी आहे, त्यात भ्रष्टाचारापासून ते मानवाधिकारांच्या उल्लंघनापर्यंत विविध मुद्द्यांचा समावेश होतो. माहिती आयोगांनी खुलासा करण्याचे आदेश दिल्यानंतरही अर्जदारांना माहिती नाकारण्यात आल्याचं गेल्या काही वर्षांमध्ये दिसून आल्याचं संसदेतील वादादरम्यान अनेक सदस्यांनी निदर्शनास आणून दिलं.

लोकनियुक्त सरकार नागरिकांना माहिती उपलब्ध करून देण्यापासून का कचरत असेल, हा मूलभूत प्रश्न या ठिकाणी उपस्थित होतो. सार्वजनिक संस्थांमध्ये स्वच्छ लोकशाही कामकाज व्हावं, याची खातरजमा करण्यासाठी जागरूक नागरिक सक्रियतेने माहिती मिळवू शकतात. कणखर लोकशाहीच्या निर्मितीमध्ये योगदान देण्याची संधी माहिती अधिकार कायद्यामुळे नागरिकांना मिळते. परंतु, सत्ताधारी पक्षाच्या धोरणांमध्ये अनुस्यूत असलेली लोकशाहीची संकल्पना नागरिकांना निष्क्रिय प्रजा म्हणून वागवणारी आहे. नागरिकांच्या जीवनावर परिणाम करणारी सरकारची धोरणं, निर्णय व कृती यांविषयीची माहिती उपलब्ध असणं उत्तरदायित्वासाठी गरजेचं असतं. राजकारणाच्या केंद्रस्थानी जनता असते, सत्ताधारी किंवा नेते नव्हेत. राज्यघटनेतील अनुच्छेद १९ व २१ अनुसार माहितीचा अधिकार मूलभूत अधिकारांमध्ये येतो, असं सर्वोच्च न्यायालयाने अनेक निकालांमध्ये स्पष्टपणे नमूद केलं आहे. राज्यघटनेतील या अनुच्छेदांद्वारे नागरिकांना अनुक्रमे अभिव्यक्ती स्वातंत्र्य व जीवन स्वातंत्र्य देण्यात आलं आहे. नियंत्रित, निवडक व विकृत माहितीचं तटस्थ ग्रहण नागरिकांनी करत राहावं, म्हणजेच प्रजा म्हणून निष्क्रिय राहावं, असा विद्यमान सरकारचा प्रयत्न सुरू आहे. प्रजेने शासकाला प्रश्न विचारणं अपेक्षित नसतं. माहितीचा पुरवठाच परिणामकारकरित्या ठप्प केला की, असे प्रश्न उपस्थित केले जाण्याची शक्यताही कमी होते. शोधपत्रकारितेवरही याचा विपरित परिणाम होईल. सत्य उघड करण्यासाठी शोधपत्रकारितेमध्ये माहिती अधिकाराचा वापर होत आला आहे. अशाने सरकारला पत्रकारितेकडून आपोआपच स्वतःचा बचाव करता येईल. तसंही सध्याचे सत्ताधारी आज्ञाधारक प्रसारमाध्यमांचा आवाज मोठा होत राहील याची तजवीज करताना दिसत आहेतच.

माहिती अधिकार कायद्याचा उगम लोकचळवळीतून झाला, आणि उत्तरदायित्वासाठीची सामूहिक कृती म्हणून त्याचा वापर किती होतो यावर या कायद्याचा पुढील

प्रवास अवलंबून आहे. (सामाजिक चळवळींव्यतिरिक्त) नागरिकांनी व्यक्तिगत पातळीवर माहिती अधिकार कायद्याचा उत्स्फूर्त वापर केल्याची अनेक उदाहरणं आहेत. यातून माहिती अधिकाराच्या मूळ प्रेरणेवर शिक्कामोर्तबच होतं. शेकडो माहिती अधिकार कार्यकर्त्यांच्या हत्या झाल्या आहेत, काहींवर हल्ले करण्यात आले आहेत, काहींचा छळ झालेला आहे व काहींना धमक्याही मिळालेल्या आहेत. व्यवस्थेकडून अथकपणे हल्ले होत असतील तर व्यक्तिगत पातळीवर असा त्याग टिकवून ठेवणं अवघड होतं. लोकांनी कष्टाने मिळवलेल्या अधिकारांच्या रक्षणासाठी लोकांनाच संघटित करावं लागेल. माहिती अधिकार कायद्यातील या दुरुस्त्या रद्द करवून घेण्यासाठी आणि मूळ अधिकार अबाधित ठेवण्यासाठी अशा लोकचळवळीची गरज आहे.

●

## व्यक्तीवर दहशतवादी असल्याचा शिक्का

*यूएपीए कायद्यातील दुरुस्त्यांमुळे व्यक्तीच्या मूलभूत अधिकारांवर गदा येण्याची शक्यता आहे.*

स्वतंत्र भारताचा इतिहास 'राष्ट्रीय सुरक्षे'च्या नावाखालील कठोर कायद्यांनी डागाळला आहे. त्यातही 'बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंधक) दुरुस्ती अधिनियम, २०१९' अनलॉफुल ॲक्टिव्हिटीज् (प्रीव्हेन्शन) ॲमेन्डमेन्ट ॲक्ट, २०१९ निष्ठूरपणासाठी विशेष लक्षवेधी ठरतो. कोणत्याही व्यक्तीला 'बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंधक) अधिनियम यूएपीए, १९६७' या कायद्यानुसार 'दहशतवादी' जाहीर करण्याचे अधिकार केंद्र सरकारला देणारी ही दुरुस्ती आहे, या मुद्द्यावरच बहुतांश सार्वजनिक चर्चा केंद्रित झालेली आहे. हा मुद्दा अर्थातच चिंताजनक आहे आणि प्रत्येक विचारी नागरिकाला भयकंपित वाटावं इतका तो गंभीर आहे.

कोणत्याही संघटनेवर 'दहशतवादी संघटना' असा शिक्का मारण्याची आणि अशा संघटनेचे सदस्य व सक्रिय सभासद यांच्यावर कारवाई करण्याची परवानगी यूएपीए केंद्र सरकारला देतो. अशा कारवाईपूर्वी कोणतीही सुनावणी किंवा प्रक्रिया पार पाडावी लागत नाही, पण संबंधित संघटना (किंवा अशा प्रकारचा शिक्का बसलेली व्यक्ती) कारवाईनंतर पडताळणी समितीसमोर (विद्यमान वा निवृत्ती उच्च न्यायालयीन न्यायाधीश या समितीचे अध्यक्ष असतात) आपलं म्हणणं मांडू शकते. या सुनावणीनंतर संबंधित संघटनेवरील वा व्यक्तीवरील दहशतवादाचा शिक्का कायम ठेवायचा की नाही, याचा निर्णय घेतला जातो.

दहशतवादी कृत्यं संघटनांकडून केली जात नाहीत, तर व्यक्तींकडून केली जातात, असे सरकारने राज्यसभेत सांगितले आहे. व्यक्तींना दहशतवादी जाहीर केले नाही, तर कायद्यातून पळवाट करण्याची संधी त्यांना मिळेल आणि ते निराळ्या नावाखाली एकत्र येतील व दहशतवादी कृत्यं सुरूच ठेवतील, असंही सरकारने स्पष्ट केलं. दहशतवादी संघटनांचे सदस्य असलेल्या व्यक्ती किंवा कोणत्या ना कोणत्या मार्गाने दहशतवादाला सहाय्य केलेल्या किंवा प्रोत्साहन दिलेल्या व्यक्ती यांच्यावर दुरुस्तीपूर्व यूएपीएद्वारेही कारवाई करता येतच होती. मग व्यक्तीला 'दहशतवादी' ठरवण्यासंदर्भात निराळी दुरुस्ती करण्यामागचा हेतू काय, असा प्रश्न उपस्थित होतो.

संयुक्त राष्ट्रांची सुरक्षा परिषद यूनायटेड नेशन्स सिक्युरिटी कौन्सिल : यूएनएससी व्यक्तींना अशा प्रकारे दहशतवादी घोषित करते, आणि भारताने संयुक्त राष्ट्रांच्या सनदेवर स्वाक्षरी केली आहे, त्यामुळे व्यक्तींना दहशतवादी जाहीर करण्याची पद्धत भारतालाही बांधील आहे, असं एक कारण या संदर्भात देण्यात आलं. या समर्थनामधून सरकारच्या कृतीचं अंशतः स्पष्टीकरण

मिळतं, परंतु यूएनएससीने दहशतवादी जाहीर केलेलं नसलेल्या व्यक्तीवरही दहशतवादाचा शिक्का मारण्याचे अधिकार केंद्र सरकारला का देण्यात आले आहे, या प्रश्नाचं उत्तर मात्र या स्पष्टीकरणातून मिळत नाही.

एखाद्या व्यक्तीवर 'दहशतवादी' असल्याचा शिक्का मारण्यासंदर्भातील प्रक्रिया त्रुटींनी भरलेली आहे. संघटनांना 'दहशतवादी' ठरवताना वापरली जाणारी प्रक्रियाच या कायदादुरुस्तीद्वारे व्यक्तींच्या बाबतीतही लागू करण्यात आली आहे. परंतु, अगदी दहशतवादी असलेल्या व्यक्तीलाही राज्यघटनेच्या कक्षेतील मूलभूत अधिकार मिळायला हवेत, याची कोणतीच फिकीर या दुरुस्तीमध्ये केलेली नाही. संघटनेला असे अधिकार नसले, तरी व्यक्तीच्या मूलभूत अधिकारांना घटनात्मक कवच लाभलेलं असतं. सरकारला राज्यघटनेतील अनुच्छेद २१ची जाणीवच नव्हती, की त्यांनी सरळ त्याकडे दुर्लक्ष केलं?

अशा प्रकारे दहशतवादाचा शिक्का बसल्याचे कोणतेही तत्काळ कायदेशीर परिणाम यूएपीएखाली होत नाहीत, परंतु इतर नकारात्मक परिणाम व्हायचे थांबतही नाहीत. दहशतवादी कृतीसंबंधी दोषी ठरवलं गेलं नाही किंवा अगदी अशा कोणत्या सुनावणीला सामोरं जावं लागलं नाही, तरीही संबंधित व्यक्तीवर आपोआप 'दहशतवादी' असल्याचा शिक्का बसतोच.

एका बाजूला, दहशतवादाच्या ठिसूळ आरोपांखाली कित्येक दशकं तुरुंगात काढायची वेळ निरपराध मुस्लीम पुरुषांवर येते, तर दुसरीकडे मुस्लिमांवरील दहशतवादी हल्ल्यांमधील आरोपींवरचे खटले राष्ट्रीय तपास संस्था जाणीवपूर्वक कमजोर करताना दिसते. अशा वेळी या कायद्याची निःपक्षपाती अंमलबजावणी होईल, असं मानणं जड जातं. तपास व कारवाईमधील 'अडचणी' दूर करण्यासाठी यूएपीएमध्ये दुरुस्ती गरजेची होती, हे समर्थन गंभीर छाननीच्या कसोटीवर टिकत नाही. नवीन तरतुदींपैकी एकही तरतूद दहशतवादी गुन्ह्यांच्या तपासाशी वा कारवाईशी प्रत्यक्ष संबंधित नाही. बहुतेकदा या तपास व कारवाईच्या प्रक्रियेला अकार्यक्षमतेने खीळ बसते.

शिवाय, या कायद्यामधील दुरुस्तीची वेळही चिंता वाढवणारी आहे. लोकसभेमध्ये दुरुस्ती विधेयक ८ जुलै रोजी मांडण्यात आलं आणि राज्यसभेमध्ये २ ऑगस्टला त्याला मंजुरी मिळाली. कोणत्याही तज्ज्ञ समितीकडे ते तपासणीसाठी पाठवण्यात आलं नाही, त्याची फारशी काही छाननीही झाली नाही आणि त्याबद्दल फारशी गंभीर चर्चाही झाली नाही. लोकसभेमध्ये सत्ताधारी पक्षाला पूर्ण बहुमत आहे आणि राज्यसभेत प्रादेशिक पक्षांकडून पुरेसा पाठिंबा त्यांना मिळाला आहे, त्यामुळे बहुतेक विधेयके संसदेत रेटून नेली जातात, तेच या विधेयकाबाबतही घडलं. संसद ही केवळ औपचारिकता झाली आहे. 'प्रोडक्टिव्हीटी'बाबतच्या अनाठायी अभिमानापायी ही संपूर्ण प्रक्रियाच प्रश्नांकित बनली आहे. या मुद्द्यावर विरोधकांनी केवळ नाममात्र प्रतिकार केला. २०१९च्या लोकसभा निवडणुकीनंतर त्यांची अवस्था गोंधळाची झाली असून भारतातील लोकशाही कल्पनेहून बिकट परिस्थितीमध्ये आली आहे.

२०१८ साली देशभरातील कार्यकर्त्यांना 'शहरी नक्षलवादी' जाहीर करून संदिग्ध आरोपांखाली ताब्यात घेण्यात आलं व जामीन नाकारण्यात आला. दहशतवादाशी लढण्यासाठी कठोर कायदे गरजेचे आहेत, पण अशा दुरुस्त्यांचा गैरवापर होऊ शकतो. या मुद्द्यावर कायदा करून व्यक्तीच्या मूलभूत अधिकारांचं जतन करण्याची जबाबदारी सरकारवर आहे.

●


**परिवर्तनाचा वाटसरूचे अंक परभणीमध्ये**

पूजा ग्रंथ वितरण

द्वारा संभाजी वाघमारे, बी. रघुनाथ हॉल,
वसमत रोड, परभणी
भ्र. ९८६०९८५६५२

# ‘झिरो बजेट’ शेतीचं मृगजळ

*शासनातील त्रुटी लपवण्यासाठी सरकारकडून ‘झिरो बजेट’ शेतीचा नवीन भ्रम पसरवला जातो आहे का?*

महाराष्ट्रातील शेतकरी सुभाष पाळेकर यांना २०१६ साली पद्मश्री सन्मान देण्यात आल्यानंतर ‘झिरो बजेट’ (नैसर्गिक) शेतीची संकल्पना प्रकाशात आली. देशातील शेती व्यवसायाला कच्च्या मालावरील खर्चामुळे बरीच अस्थिरता व असुरक्षितता अनुभवावी लागते, या पार्श्वभूमीवर नैसर्गिक शेतीची पद्धत या समस्येतून संभाव्य वाट काढून देणारी ठरेल, अशी अनेकांची धारणा आहे. एक, व्यापारी बियाणं, खतं व रसायनं यांची खरेदी व वापर बंद केल्याने उत्पादन खर्चात मोठी कपात होते. दोन, (मुख्यत्वे पहिल्या घटकाचा परिणाम म्हणूनच) कर्जावरील शेतकऱ्यांचं अवलंबित्व कमी झाल्यामुळे त्यांना पडणारा कर्जविळखाही टाळता येतो. केंद्रातील भारतीय जनता पक्षाच्या सरकारने देशामधील शेतीसंकटावर उपाययोजना म्हणून झिरो बजेट शेतीला प्रोत्साहन द्यायचा निर्णय घेतला (‘आर्थिक सर्वेक्षण २०१८-१९’ आणि २०१९चा अर्थसंकल्प यांमध्ये सदर संकल्पनेचा विशेष उल्लेख होता). या कृतीमागे वरील दोन घटक कारणीभूत असतील तर सरकारच्या हेतूविषयी आपण व्यक्त केलेल्या साशंकतेकडे टीकाखोरपणा म्हणून दुर्लक्ष करता येईल. पण काही कठोर वास्तवांकडे दुर्लक्ष करता येईल का?

पाळेकर यांचा २०१६ साली सन्मान झाला, परंतु त्यांचे शेतीसंबंधीचे प्रयोग दशकभरापूर्वी झालेले होते, असं दिसतं. परंतु, या संदर्भात प्रसिद्ध झालेल्या काही बातम्या, काही नमुना-अभ्यास (हे सगळं पद्मश्रीच्या वेळेस प्रकाशित झालं व त्याचा प्रसारही त्या वेळी करण्यात आला) आणि खुद्द पाळेकरांनी झिरो बजेट शेतीच्या तंत्राविषयी लिहिलेली पुस्तकं वगळता, या शेतीप्रारूपाचं कोणतंही स्वतंत्र व सखोल आर्थिक मूल्यमापन सार्वजनिक अवकाशात उपलब्ध नाही. ला व्हिआ कॅम्पेसिना (एलव्हीसी) या ८१ देशांमधील १८२ शेतकरी संघटनांच्या संयुक्त संस्थेने २०१६ साली या तंत्राविषयी एक नमुना-अभ्यास केला. कर्नाटकात पाळेकरांच्या प्रयोगामध्ये सहभागी झालेले बहुतांश शेतकरी ‘मध्यम शेतकरीवर्गा’तील होते, असं या संस्थेच्या अहवालात म्हटलं होतं. त्यामुळे सदर प्रारूपातील समावेशकतेचा मुद्दा विवाद्य ठरतो, शिवाय या प्रारूपाची व्याप्ती व शाश्वतता हे पैलूही पुरेसे स्पष्ट झालेले नाहीत. झिरो बजेट शेतीमधून मिळालेल्या उत्पादनाच्या विपणनावर मोठीच मर्यादा येते, असं याच अहवालात म्हटलं आहे. अलीकडच्या काही बातम्यांनुसार, झिरो बजेट शेतीचं तंत्र वापरणाऱ्या काही शेतकऱ्यांनी नफादायकतेच्या कारणावरून पुन्हा पारंपरिक कच्च्या मालावर आधारित शेतीचा वापर सुरू केल्याची अनेक उदाहरणं समोर आली आहेत.

झिरो बजेट शेतीचे शेतकऱ्यांवर- विशेषतः अल्पभूधारक शेतकऱ्यांवर होणारे परिणाम लक्षात घ्यावे लागतात. अशा वेळी २०२० साली शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करण्यासाठीची व्यूहरचना म्हणून केंद्र सरकारने या तंत्राला प्रोत्साहन देण्याची भूमिका कशाच्या बळावर घेतली? एलव्हीसीच्या उपरोल्लेखित नमुना अभ्यासामध्ये नमूद केल्यानुसार, झिरो बजेट शेतीचा मुख्य लाभार्थी ‘मध्यम शेतकरीवर्ग’ असेल, तर सरकारची भूमिका राजकीय स्वार्थातून आल्याचं म्हणावं लागेल. ऐतिहासिकदृष्ट्या मध्यम शेतकरीवर्गाने- राजकीय दबाव गट म्हणून- या देशातील राजकीय पक्षांचं निवडणुकीतील भवितव्य ठरवण्यामध्ये कळीची भूमिका निभावली आहे. विशेषतः उत्तर भारतातील हिंदी पट्ट्यामध्ये हा वर्ग अधिक महत्त्वाचा ठरतो. लहान/सीमान्त शेतकऱ्यांना व शेतमजुरांना या दबावाच्या राजकारणातून वगळण्यात आलं आहे, त्यामुळे या देशातील शेतकऱ्यांच्या निदर्शनांमध्ये कोणत्याही प्रकारचा परिवर्तनकारी

जहालपणा येण्याची शक्यता आपोआपच मंदावून जाते. अशा परिस्थितीत कृषिसमाजासाठी 'परिवर्तनकारी' ठरणारी सरकारी धोरणं कधीच आखली गेली नाही, केवळ त्यांना 'शांत करणारी' धोरणंच राबवली गेली.

'भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना यांमध्ये वाजवी नुकसान भरपाई व पारदर्शकता राखण्याचा अधिकार अधिनियम, २०१३' या कायद्यातील अनिवार्य 'सहमती'ची आणि सामाजिक परिणामाचं मूल्यमापन करण्याची तरतूद रद्द टाकण्यासाठी डिसेंबर २०१५मध्ये वटहुकूम काढण्यात आला, तेव्हा राजकीय निदर्शनं झाली होती. या पार्श्वभूमीवर, २०१६ साली पहिल्यांदा झिरो बजेट शेतीला (व या तंत्राचे समर्थक पाळेकर यांना) मान्यता मिळाली, हे इथे लक्षात घ्यायला हवं. जमिनीच्या 'मालकी'चा प्रश्न अस्थिर अवस्थेत आहे, अशा वेळी शेतीतंत्रज्ञानाविषयीच्या कोणत्याही शिफारसीचा शेतकऱ्याला नक्की काय उपयोग होईल? शिवाय, या तंत्राचं नाव झिरो बजेट शेती असं असलं, तरी या तंत्रामध्ये शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च शून्यावर येतो, असं नव्हे. तर, 'आंतरपिकां'द्वारे उत्पादनखर्चाची भरपाई होईल, आणि शेतीचा व्यवहार झिरो-बजेटसारखा होऊ शकेल, असा या तंत्राचा दावा आहे. एकल पीक शेतीला (मोनोकल्चर) प्रोत्साहन देणारी सध्याची रचना (किमान हमीभावासारखी धोरणं) बदलल्याशिवाय आंतरपीक शेती तंत्रज्ञानाला चालना दिली जात असेल, तर त्यातून स्वघोषित 'शेतकरीस्नेही' सरकारच्या राजकीय इच्छाशक्तीबद्दल बरेच खुलासे आपोआपच होतात.

झिरो बजेट शेतीच्या माध्यमातून 'मूलभूत तत्त्वांकडे परत जाण्या'चं वावदूक आवाहन केलं जातं. त्यामुळे जनतेच्या राष्ट्रवादी भावनेला उत्तेजित करण्याचा कार्यक्रम राबवू पाहणाऱ्या सरकारला हे तंत्र सोयीचंच आहे. देशात लवचिक शेती व्यवस्थेचा सर्वांगीण विकास करण्यासंबंधीची जबाबदारी सरकारवर असली, तरी त्याबाबत कठोर प्रश्न विचारले जाऊ नयेत यासाठी लोकांचं लक्ष विचलित करण्याचं काम या तंत्राद्वारे केलं जाईल. शासन पातळीवरील गफलतीचे अनेक स्फोटक मुद्दे या वावदूकपणामध्ये लपलेले आहेत, हे सूक्ष्म निरीक्षकांच्या लक्षात येईल. उदाहरणार्थ, 'मूलभूत तत्त्वांकडे परत जाणं' याचा अर्थ कमी-खर्चिक शेतीव्यवस्था विकसित करणं असा असल्याचं सांगितलं जातं; मग झिरो बजेट शेतीचा एक प्रमुख समर्थक असलेल्या आंध्र प्रदेशामध्ये 'हवामानपूरक झिरो बजेट नैसर्गिक शेती कार्यक्रमा'साठी सुमारे १७,००० कोटी रुपयांचा निधी का गोळा करावा लागला? जागतिक वित्तीय व शेतीव्यावसायिक कंपन्यांकडून आणि हवामान रोख्यांद्वारे इतकी मोठी गुंतवणूक या तंत्रामध्ये केली जात असेल, तर धोरण व उपयोजन यांमधील अंतर्विरोध उघड आहे. खरं तर, नव-उदारमतवादी राज्यसंस्थेला स्वतःचा उद्देश साध्य करण्यासाठी झिरो बजेट शेतीचं नवीन साधनच मिळाल्याची अस्वस्थकारक शंका यातून उपस्थित होते. एका बाजूला कॉर्पोरेट क्षेत्रातील उपकारकर्त्यांना सवलती देणं आणि दुसऱ्या बाजूला अग्रक्रमावरील क्षेत्रांमधील खर्चात कपात करणं, असा नव-उदारमतवादी राज्यसंस्थेचा दुहेरी उद्देश या तंत्राद्वारे साधला जातो. ●


**परिवर्तनाचा वाटसरूचे अंक मिळण्याची ठिकाणे**

मीडिया ॲडस्

द्वारा राहूल वाघमारे, विष्णू कॉम्प्लेक्स,
हॉटेल ताज पाटील समोर, नांदेड
भ्र. ९८६००८३१३४

अर्हन्त बुक डिस्ट्रिब्युशन

द्वारा विश्वदिप मेडिकल स्टोअर्स, एच. बी. टेकाळे,
तुळजाई हॉस्पिटलसमोर, प्रकाशनगर, लातूर
भ्र. ९७६७८०११४०

## ‘ब्रिक्स’चं कोलमडणारं बांधकाम

*एका अस्पष्ट भू-आर्थिक संकल्पनेवर पांघरूण घालण्यासाठी ‘ब्रिक्स’ चा गाजावाजा आहे का?*

नोव्हेंबर २०१९मध्ये होणाऱ्या अकराव्या ब्रिक्स (ब्राझील, रशिया, भारत, चीन व दक्षिण आफ्रिका) शिखरबैठकीचा कार्यक्रम ठरवण्यासाठी रिओ दि जनेरो इथे २८ जुलै २०१९ रोजी मंत्रीस्तरीय बैठक झाली. व्हेनेझुएलातील प्रश्नाच्या सोडवणुकीवरून सदस्य-देशांमध्ये असलेला विसंवाद या बैठकीच्या सुरुवातीलाच उघड झाला. विस्तारत्या जागतिक सहकार्याचे युग संपुष्टात आले आहे, याचाच आविष्कार या विसंवादामध्ये पाहायला मिळाला. परंतु, विज्ञान, तंत्रज्ञान, अभिनवता, डिजीटल अर्थव्यवस्था व दहशतवादाचा प्रतिकार आणि आर्थिक अफरातफर यांसारख्या विविध प्रश्नांवरील सहकार्याबाबत मात्र चर्चा गरजेची आहे, याबद्दल सदस्य-देशांमध्ये सकृत्दर्शनी एकमत आढळलं. या एकमताच्या जोरावर ब्रिक्स ही संघटना स्वतःचं संस्थांचं जाळं असलेली परिपूर्ण शक्ती म्हणून पुनरुज्जीवित होईल का, हे येणारा काळच ठरवेल.

जगातील या सर्वांत प्रमुख उदयोन्मुख अर्थव्यवस्थांना एकत्र आणणं संकल्पनात्मक (आणि परिणामी उक्तीच्या पातळीवर) उपयुक्ततेचं असलं, तरी या देशांमधील सहकार्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी कायम संदिग्ध राहिलेली आहे, कारण त्यांची वित्तीय व राजकीय वास्तवं विभिन्न स्वरूपाची आहेत. ब्राझीलने राष्ट्राध्यक्ष जैर बोल्सोनारो यांच्या कार्यकाळामध्ये परराष्ट्रीय धोरणाचे अग्रक्रम या वर्षी बदलले, त्यातून या संदिग्धतेला आणखी खतपाणी मिळालं. गेलं जवळपास दीड दशक ब्राझीलच्या परराष्ट्रीय धोरणामध्ये बहुधृवीय जगाचा व्यापक स्वीकार करण्याला अग्रक्रम देण्यात आला होता. या बहुधृवीयतेमध्ये ‘समतोल साधणारी शक्ती’ म्हणून ब्राझीलची उपस्थिती असावी, यासाठी दक्षिण-दक्षिण सहकार्याच्या धाटणीच्या बहुधृवीयतेचे प्रयत्न बोल्सोनारो यांच्या पूर्वसुरींनी केले होते. परंतु, नवीन मुत्सद्देगिरीने पाश्चात्त्य राष्ट्रांशी- विशेषतः अमेरिकेशी संबंध ठेवण्याला विशेष स्थान देत बहुधृवीयतेला नाकारलं आहे. या राजनैतिक उद्दिष्टांशी जोडून आलेल्या मर्यादित (किंवा शून्य) जागतिक महत्त्वाकांक्षांमुळे ब्राझील हा ब्रिक्समधील दुबळा दुवा बनला आहे. स्थलांतराविषयी अलीकडेच स्वाक्षरी झालेल्या जागतिक करारामधून माघार घेणं, किंवा दशकभरापासूनचा व्यापारी भागीदार असलेल्या चीनसोबतचे वादग्रस्त राजनैतिक संबंध अचानक बदलणं, किंवा व्हेनेझुएलातील निकोलास मदुरो यांना राष्ट्राध्यक्षपदावरून खाली खेचण्यासाठी अमेरिकेच्या राजकीय/सैनिकी हस्तक्षेपावर स्वघोषितरित्या विसंबून राहाणं, यांसारखे अनेक निर्णय ब्राझीलमधील नवीन सत्ताधाऱ्यांच्या परराष्ट्रीय धोरणातील बदल स्पष्ट करतात.

किमान आर्थिक दृष्टिकोनातून ब्रिक्स या संकल्पनेला आता काही अर्थ उरलेला नाही, असं मत २००८-०९च्या जागतिक वित्तीय संकटानंतर मोठ्या प्रमाणात- विशेषतः अमेरिकेकडून- मांडलं जातं आहे. ब्रिक्सच्या सदस्य-देशांमधील- विशेषतः चीनमधील- सकल घरेलू उत्पन्न (ग्रॉस डोमेस्टिक प्रॉडक्ट : जीडीपी) वाढीचा दर कोलमडत असल्याच्या अंदाजावरून हे मत दिलं जात होतं. चीनमधील दोन आकडी वृद्धी दर ७ टक्के किंवा त्याहूनही खाली आला होता. या अंदाजांच्या विरोधात जाणारा अंदाज गोल्डमॅन सच्सने व्यक्त केला होता. ब्रिक्स या शाब्दिक लघुरूपाचा वापर या कंपनीनेच पहिल्यांदा केला. तर, २००० सालापासून पुढील वर्षांमध्ये जागतिक आर्थिक वृद्धीसाठीचं वंगण ठरण्याची क्षमता ब्रिक्स गटाकडे असल्याचं मत या कंपनीने व्यक्त केलं. गोल्डमॅन सच्सने २०१५ साली स्वतःचा ब्रिक्स निधी सार्वत्रिक उदयोन्मुख बाजारपेठ निधीमध्ये बदलून घेतला, कारण २०१० साली शिखरावर पोचल्यानंतर या निधीने

जवळपास ८८ टक्के मालमत्ता गमावल्या होत्या. सप्टेंबर २०१५मध्ये 'यूएस सिक्युरिटीज् अँड एक्सेंज कमिशन'कडे माहिती सादर करताना या गुंतवणूक कंपनीने स्पष्ट केले की, परराष्ट्रीय व उदयोन्मुख बाजारपेठांच्या अधिक वैविध्यपूर्ण विश्वामध्ये जिवंत निधीची पुनर्रचना केली जाईल. ही साशंकता दूर सारत २०१४ साली नवीन विकास बँक (न्यू डेव्हलपमेन्ट बँक : एनडीबी) स्थापन झाली. पारंपरिक जागतिक शासन रचनेमध्ये ब्रिक्स देशांचं प्रतिनिधित्व पुरेसं नसल्याचं कारण देत त्याला प्रतिसाद म्हणून या बँकेची स्थापना करण्यात आली.

न्यूनप्रतिनिधित्वाविषयीच्या या सामायिक रोषातून ब्रिक्स हा गट उदयाला आल्याचं मान्य केलं (आणि त्यामागे कोणतीही सामायिक विचारसरणी, राजकीय रचना वा संस्कृती नसल्याचं स्वीकारलं), तर रोषाची ही 'भावना' टिकेल तितकाच काळ हा गटही टिकून राहील, हे नाकारता येणार नाही. या पार्श्वभूमीवर अमेरिकेशी जवळीक साधायचे ब्राझीलचे प्रयत्नही ब्रिक्सच्या शाश्वततेला धोकादायक ठरू शकतात, त्याचप्रमाणे भूराजकारणामध्ये संयुक्त राष्ट्रांची मध्यवर्ती भूमिका बळकट करण्याचा रशियाचा निर्धारही या गटाच्या दृष्टीने बाधक ठरू शकतो. दोन्ही बाबतीत, अनुनयाच्या दबावामुळे धोरणं निश्चित केलेली आहेत, त्यामुळे ब्रिक्सच्या आणि/वा त्याच्या संस्थांच्या- विशेषतः एनडीबीच्या स्वायत्ततेवर मर्यादा आली आहे. अशा धोरणात्मक अभिसरणाच्या वरून-खाली वाहणाऱ्या राजकीय चालकांविषयीच्या उपलब्ध वाङ्मयामध्ये असं म्हटलं आहे की, (आर्थिक) धोरणांमधील सुधारणांसाठी सक्ती करणे वा सौहार्दीकरण साधणं, यांऐवजी परस्परावलंबी पद्धतीने समस्या सोडवण्याकरिता 'धोरणात्मक प्रसारा'चा चालक घटक म्हणून वापर करणं इष्ट ठरतं.

त्याचप्रमाणे ब्रिक्समधील अंतर्गत आर्थिक विचलनाचे परिणामही दुर्लक्षून चालणार नाहीत. किंबहुना, या गटातील आर्थिक विषमतेमुळे यातील सदस्यांमध्ये एकमेकांविरोधातही रोष उत्पन्न होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. उदाहरणार्थ, चीनकडे अतिरिक्त रोकड निर्माण झाली आहे, त्यामुळे एनडीबीच्या प्रस्तावित १०० अब्ज डॉलरांच्या 'कॉन्टिन्जन्सी रिझर्व अॅरेन्जमेन्ट'पैकी दोन पंचमांश योगदान देण्याची प्रतिज्ञा चीनने केली आहे. या मार्गाने पुढील काळात बँकेवर वर्चस्व गाजवण्याचा आणि/किंवा ब्रिक्समध्ये अथवा व्यापक विकसनशील जगामध्ये युआनच्या प्रभुत्वाखालील व्यापाराला चालना देण्याच्या संधी शोधण्याचा चीनचा प्रयत्न असू शकतो.

ब्रिक्स या संकल्पनेमध्ये अशा प्रकारच्या अंतर्गत संदिग्धता आहेत, त्यामुळे ही संकल्पना केवळ शाब्दिक लघुरूपापुरती मर्यादित राहिल्याचं आपल्याला म्हणता येईल. 'बहुराष्ट्रीयते'च्या कालबाह्य उक्तीला ओलांडता न आलेला हा गट आहे, असा निष्कर्ष यातून निघण्याची शक्यता आहे. ●

इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीचे संपादकीय लेख अनुवादित करण्यासाठी 'एच. टी. पारेख फाऊंडेशन'चे साहाय्य लाभले आहे. (दि. २७ जुलै आणि ३ व १० ऑगस्ट या अंकांतून. 'पुनर्विचाराची संकल्पना व अनुच्छेद ३७०' हे संपादकीय गोपाळ गुरू यांनी लिहिले आहे.)

## परिवर्तनाचा वाटसरूचे अंक मिळण्याची ठिकाणे

**अथर्व पब्लिकेशन्स**
तळमजला, ओम हॉस्पिटल,
अँग्लो उर्दू हायस्कूलजवळ, दत्त कॉलनी,
जळगाव-४२५००१
दू. ०२५७-२२३९६६६

**युनिक बुक्स**
२रा मजला, देविदास आर्केड, पंचवटी चौक,
मोर्शी रोड, अमरावती ४४४ ६०४
दू. ०७२१-६५२१२४३